# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ३३-२२** **दिनांक ०२/०२/२०२२**

**व्हाटस्‌ॲपच्या माध्यमातुन मुलींचे फोटो पाठवुन वेश्याव्यवसाय करण्याऱ्या महिलेवर कारवाई करुन ०२ मुलींची सुटका.**

दिनांक ०१.०२.२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध भाईंदर पथकाचे पोहवा/९२०३३ उमेश पाटील यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मिरारोड परिसरात राहणारी महिला नामे तनु व तिचा साथीदार मेहुल असे दोघे मिळुन पुरुष गिऱ्हाईकांना व्हॉटसॲपद्वारे मुलींचे फोटो पाठवून व चॅटींग करुन वेश्यागमनाच्या मोबदल्यात मुलींना मिरा-भाईंदर परिसरातील लॉजमध्ये पाठवितात.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. एस एस पाटील यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना परिवार हॉटेल, पुनम सागर कॉम्प्लेक्स, मिरारोड स्टेशन रोड, मिरारोड पुर्व या ठिकाणी पाठवुन सत्यता पडताळुन पोलीस पथकासह छापा टाकला असता महिला दलाल तनु शर्मा हि वेश्यागमनाच्या मोबदल्यात पुरुष गिऱ्हाईकांना मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने सदर बाबत पोहवा/९२०३३ उमेश हरी पाटील यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्याने आरोपी तनु शर्मा, व पाहिजे आरोपी तिचा साथीदार मेहुल रा. काशिमिरा यांचेविरुध्द नयानगर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ४८/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, पो.हवा./९२०३३ उमेश पाटील, पोहवा/९५००८ रामचंद्र पाटील, पोशि/१२११८ केशव शिंदे व मपोशि/०३००८ सुप्रिया तिवले अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.